## वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ५० खालील आदेश
## (पारीत दिनांक १३.१०.२०२२)
## CNR No.MHLA140009832018

**०१**. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ०८ ने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७*** अनुसार जवाब दाव्यामध्ये दुरुस्ती करुन त्यामध्ये परिच्छेद ०३ नंतर परिच्छेद क्रमांक ०३–अ आणि ०३–ब यांची भर घालण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२**. प्रतिवादी क्रमांक ०८ चे असे म्हणणे आहे की, वादपत्रात नमूद असलेल्या मिळकती म्हणजेच गट क्रमांक ४७ आणि ६१ या त्याच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत. वादीने वादपत्रात मौजे जयनगर येथील मिळकत क्रमांक ५२ व ५४ आणि गट क्रमांक ५८ व ५५ यांचा वाद मिळकत म्हणून समावेश केलेला नाही. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०८ ला जवाब दाव्यामध्ये दुरुस्ती करुन त्यामध्ये परिच्छेद ०३ नंतर परिच्छेद क्रमांक ०३–अ आणि ०३–ब यांची भर घालायची आहे.

**०३**. वादीने म्हणणे **नि.क्र.५२** दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, वादपत्रात सर्व एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा समावेश आहे. प्रतिवादी क्रमांक ०८ ने न्यायालयाचा वेळ वाया घालवण्यासाठी आणि दावा प्रलंबित ठेवण्यासाठी अर्ज केला आहे. वादीने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४**. प्रतिवादी क्रमांक ०८ तर्फे **विधीज्ञ श्री. ए. टी. बिराजदार** आणि वादीतर्फे **विधीज्ञ श्री. ए. बी. पाटील** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०५**. **विधीज्ञ श्री. बिराजदार** यांनी असा युक्तिवाद केला की, जवाब दाव्यात दुरुस्ती केल्यामुळे दावा निकाली करणे सोयीचे होणार आहे. जवाब दाव्यात कोणत्याही टप्प्यावर दुरुस्ती करता येते. वादीचे त्यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही.

**०६**. प्रतिवादीतर्फे **विधीज्ञ श्री. बिराजदार** यांनी युक्तिवादाच्या समर्थनार्थ *माननीय नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठातील राजाराम वि. स्टेट ऑफ गोवा, २०१६(१) एम. एच. एल. जे. ७७०*, *माननीय नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील अनिल रामसिंग बिलवार वि. अनिता गोपाल कदम, २०२२ (१), एम. एच. एल. जे. ३४५* आणि *माननीय नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या स्टेट ऑफ बिहार वि. मॉर्डन टेंट हाऊस, २०१८(२), एम. एच. एल. जे. ०१* यामध्ये नोंदविलेल्या निरीक्षणांवर भर दिला.

**०७**. **विधीज्ञ श्री. पाटील** यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीची प्रस्तावित दुरुस्ती वाद निकाली करण्यास उपयुक्त नाही. प्रतिवादीने दावा निकाली होण्यास विलंब करण्याकरिता अर्ज केला आहे. प्रतिवादीने भरवसा ठेवलेले न्यायनिवाडे वेगळया मुद्दयांवर असल्याने लागू होत नाहीत. म्हणून अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

**०८**. प्रतिवादीने जवाब दावा **नि.क्र.४४** दिनांक **१९.०१.२०२२** रोजी दाखल केला आहे. दाव्यात वाद मुद्दे स्थापन नाहीत. प्रस्तावित दुरुस्ती दावा गुणदोषांवर चालविण्यासाठी आवश्यक आहे. म्हणून प्रतिवादीला जवाब दाव्यात परिच्छेद क्रमांक ०३ नंतर परिच्छेद क्रमांक ०३–अ आणि ०३–ब अशी दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायाचे आहे. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. प्रतिवादी क्रमांक ०८ चा अर्ज **नि.क्र.५०** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने जवाब दावा **नि.क्र.४४** मध्ये परिच्छेद क्रमांक ०३ नंतर परिच्छेद क्रमांक ०३–अ आणि ०३–ब अशी दुरुस्ती १४ दिवसांत करुन जवाबदाव्याची एकत्रीत प्रत दाखल करावी.

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2022.10.14 12:45:58 +0530

**(श्री. एस. एल. फुले.)**

**दिनांकः– १३.१०.२०२२.** **दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण – औसा.** **जिल्हा लातूर.**